Shri Sharda Bhavan Education Society's

# Yeshwant Mahavidyalaya, Nanded

# Department of Music



## Induction Program 2023-24

## ** संगीत विभाग सत्रारंभ २०२३ -२४ **

**दिनांक 1. 9. 2023 रोजी सकाळी 10 वाजता संगीत विभागात इंडक्शन प्रोग्राम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये बी.ए प्रथम, द्वितीय, तृतीय त्याचबरोबर बी.ए द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाचे स्किल विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.**

**या कार्यक्रमात विशेष उपस्थिती म्हणून सतीश राऊत खेडकर हे उपस्थित होते. सतीश राऊत खेडकर हे संगीत विभागाचे माजी विद्यार्थी तथा महाविद्यालयाचे माजी जी.एस आहेत. त्याचबरोबर या कार्यक्रमाला संगीत विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस व्ही शिंदे, प्रा.संगीता चाटी, दत्तासिंह ठाकुर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस व्ही शिंदे यांनी प्रमुख पाहुणे व पारंपारिक गोंधळ चे कलाकार व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सतीश राऊत खेडकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्याचबरोबर प्रा.संगीता कुलकर्णी चाटी यांचा प्रा. डॉ. एस व्ही शिंदे सर यांचा विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.**

**या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक शिंदे सरांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. संगीताचाटी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी माधवी शिवमुर्ती मठपती व बी.ए तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्रेरणा बुद्धेवाड यांनी केले.**

**या कार्यक्रमात प्रमुख वक्ते सतीश राऊत खेडकर यांनी पारंपारिक गोंधळ व त्यामधील अंतर्भूत साहित्य, वाद्य, वाद्य वादन, गोंधळाचे सादरीकरण याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपारिक गोंधळातून, पारंपारिक गोंधळाच्या सादरीकरणातून मिळकत कशी मिळू शकते व उदरनिर्वाह कसा होऊ शकतो, याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात गोंधळाचा इतिहास सविस्तर उलगडून दाखविला त्याचबरोबर त्यांनी पारंपारिक तीन गोंधळाचे सादरीकरण सर्वांसमोर केले.**

**या कार्यक्रमात संगीत विभागामध्ये उपलब्ध असलेले साहित्य, विभागातर्फे चालत असलेला ॲडऑन कोर्स, विभागात असलेल्या सुविधा, विभागातर्फे आयोजित स्पर्धा सहभागी विविध स्पर्धा याबद्दल सर्व विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एस व्ही शिंदे यांनी सविस्तर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तर संगीता चाटी मॅडम यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना हार्मोनियम तानपुरा याची बैठक कशी असावी त्याची वाजवण्याची पद्धत कशी असावी स्वरात मिळविण्याची पद्धत कशी आहे याबद्दल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्राध्यापक शिंदे यांनी तबला ढोलक ढोलकी पखवाज या**

वाद्यांची संपूर्ण माहिती देऊन त्या वाद्यांची वादन शैली विद्यार्थ्यांना सादरीकरण करून दाखविले.

या कार्यक्रमात कनिष्ठ यशवंत महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या प्राध्यापिका सौ दिपाली नालमवार मॅडम उपस्थित होत्या त्यांनी आपल्या मार्गदर्शनात संगीत विषयातील करिअरच्या विविध संधी याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांचे स्वागत प्राध्यापिका संगीतासाठी मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

या विभागातील माजी विद्यार्थी हरिदास उमाटे, व राजे सरोदे यांनी विविध स्पर्धेत मिळविलेल्या बक्षीसांसंदर्भात त्याचबरोबर त्यांनी विभागाला दिलेल्या योगदानाबद्दल संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

याच कार्यक्रमात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्राध्यापक किरण सावंत किरण सर हे ही ऐनवेळी उपस्थित राहिले किरण सावंत हे संगीत विभागाचे माजी विद्यार्थी आहेत त्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र, शासन केंद्र सरकार, गांधर्व महाविद्यालय यांच्यातर्फे संगीत विषयासाठी देण्यात येणाऱ्या विविध स्कॉलरशिप बद्दल माहिती दिली त्या स्कॉलरशिप चे फॉर्म कधी निघतात त्याची परीक्षा कुठे आणि केव्हा होते तो फॉर्म कसा भरायचा असतो याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर त्यांनी बाजीराव मस्तानी या चित्रपटातील सुप्रसिद्ध गीत "आयात" चे सर्वांसमोर उत्कृष्ट सादरीकरण केले.

या कार्यक्रमासाठी जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी संगीत विभागातील विविध साहित्य स्वतः हाताळून पाहिले.

या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांतर्फे बीए द्वितीय वर्षाच्या प्रदीप नरवाडे या विद्यार्थ्याने शास्त्रीय गायन व अभंग गायन करून सर्वांची मने जिंकले.

या कार्यक्रमाला सर्व संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग घेतला होता.









